ठळक बातम्या

- भारत आणि नेपाळच्या प्रधानमंत्र्यांमध्ये नवी दिल्लीत चर्चा, महापुरातून सावरण्यासाठी २४ हजार कोटी नेपाळी रुपयांची मदत जाहीर

- WhatsApp Web वापरताना खबरदारी घेण्याचं केंद्रीय गृह मंत्रालयाचं आवाहन

- डिजिटल घोटाळ्यांमुळं ग्राहकांचं होणारं नुकसान रोखण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून अतिरीक्त दिशानिर्देश जारी

आणि

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मालिकेतला पहिला कसोटी सामना अनिर्णित, कसोटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात थेट स्थान मिळवण्याच्या भारताच्या आशा धूसर

<><><><><>

ऑगस्ट महिन्यात नेपाळमध्ये आलेल्या महापुरानंतर नेपाळला मदत करण्यासाठी भारत २४ हजार कोटी नेपाळी रुपयांची मदत करणार आहे. भारतानं नेपाळला आतापर्यंत दिलेली ही सर्वात मोठी आर्थिक मदत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ही घोषणा केली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

होल्ड... कॅप्सूल-

नेपाळमध्ये ऑगस्ट महिन्यात आलेल्या विनाशकारी महापुरात हजारो लोक मृत्यूमुखी पडले होते, तसंच अनेक गावांचा संपूर्ण विध्वंस झाला होता. पायाभूत सुविधा, तसंच ऊर्जा आस्थापनांनाही मोठा फटका बसला होता. हे सगळं पुन्हा उभं करण्यासाठी भारतानं पुन्हा उभं करण्यासाठी नेपाळला २४ हजार कोटी नेपाळी रुपयांच्या पॅकेजची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, नेपाळचे प्रधानमंत्री बालेंद्र

शहा यांच्याबरोबर नवी दिल्लीत झालेल्या चर्चेनंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात केली.

होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

भारत आणि नेपाळ यांच्यात आज विविध क्षेत्रांमधलं सहकार्य वाढवण्यासाठी एकंदर ८ करार झाले. आरोग्य, पारंपरिक औषधं, उपग्रह संपर्क जोडणी स्थापन करणं, क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम, शाश्वत शहरी विकास, पशुपालन आणि मासेमारी विकासात शैक्षणिक आणि संशोधन इत्यादी क्षेत्रांचा यात समावेश आहे. नवी दिल्लीत उभय नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी दोन्ही नेत्यांनी विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणीही केली. प्रधानमंत्री मोदी आणि नेपाळचे प्रधानमंत्री बालेंद्र शहा यांनी अयोध्या आणि जनकपूर दरम्यानच्या शरयू-कमला एक्सप्रेस ट्रेनला दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. याशिवाय भारतातलं धारचुला आणि नेपाळमधलं दारचुला यांना जोडणाऱ्या रस्त्यावरच्या पुलाचं उद्घाटन, मोतिहारी-अमलेखगंज पाईप जोडणीच्या तिसऱ्या टप्प्याचं लोकार्पण, बनबासा इथं एकात्मिक तपासणी नाक्याची पायाभरणी, नेपाळमधल्या झापा इथं ग्रीनफील्ड तेल साठवण टर्मिनलची पायाभरणी, तसंच कोशो प्रांतात ६६९ मेगावॅट क्षमतेच्या अरुण जलऊर्जा प्रकल्पाची पायाभरणी इत्यादी प्रकल्पांचा यात समावेश आहे.

बालेंद्र शहा यांनी आज राष्ट्रपती भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतली. भारत आणि नेपाळ यांच्यातले मजबूत संबंध हे सामायिक सांस्कृतिक वारसा आणि दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या दृढ नात्यावर आधारलेले आहेत, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

सार्वजनिक किंवा सामायिक वापरातल्या संगणकावर लॉग इन केलेला व्हॉट्सॲप वेब हा पर्याय सायबर गुन्हेगारांसाठी पूरक ठरू शकतो, असा इशारा

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सायबर गुन्हे विरोधी शाखेने दिला आहे. या वेब सेशनच्या माध्यमातून खात्यावर नियंत्रण मिळवणं, खासगी संभाषण वाचणं आणि त्या माध्यमातून फसवणूक करण्याची शक्यता, तसंच अन्य आर्थिक सायबर गुन्ह्यांसाठी वापरकर्त्याच्या ओळखीचा वापर होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे अशा संगणकांवर गोपनीय प्रकारची वैयक्तिक किंवा व्यावसायिक कामं करणं टाळावं, वापरकर्त्यांनी काम झाल्यानंतर वेब सेशन बंद करण्यासाठी ब्राउझर किंवा विंडो बंद करणं पुरेसं नसून प्रत्येक वेळी लॉग आउट पर्याय निवडण्याचा सल्लाही गृहमंत्रालयाने दिला आहे.

<><><><><>

पेयजलाचा नमुना असुरक्षित असल्यानं बिसलेरी कंपनीविरोधात खटला चालवायला FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे. या नमुन्यात पॉलिन्यूक्लियर ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स आढळल्यामुळे हे पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचं निष्पन्न झालं होतं. त्यामुळे कंपनी आणि तिच्या काही वितरकांविरुद्ध खटला चालवायला प्राधिकरणानं मंजुरी दिली आहे. दरम्यान, आपलं पेयजल सुरक्षित असल्याचा दावा बिसलेरी कंपनीने केला आहे. पाण्याच्या नमुना तपासणीच्या निष्कर्षांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या करवाईची कोणतीही औपचारिक सूचना मिळाली नसल्याचाही दावाही कंपनीने केला आहे.

<><><><><>

वायूप्रदूषणावर उपाय म्हणून दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात केवळ बीएस सिक्स दर्जाच्या वाहनांनाच परवानगी देण्याचा विचार असल्याचं सर्वोच्च न्यायालायने आज सांगितलं. दिल्लीबरोबरच, हरियाणा, पंजाब आणि उत्तरप्रदेश राज्य सरकारांनी प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या उपायांची माहिती न्यायालयात सादर करावी असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे मतदारयाद्यांच्या सखोल पुनरिक्षण प्रक्रीयेत अपीलीय न्यायधिकरणांची संख्या वाढवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालायने आज केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले. कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी सल्लामसलत करुन ही कारवाई करावी असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठानं स्पष्ट केलं आहे. पश्चिम बंगालमधे जिथं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या असतील तिथल्या सुनावणीला, विशेषतः नावं वगळल्याच्या तक्रारींच्या सुनावणीला प्राधान्य द्यावं असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

देशातल्या शहरांसाठी लवकरच आर्थिक निर्देशांक प्रसिद्ध केले जातील, अशी माहिती केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाचे सचिव डॉ. सौरभ गर्ग यांनी आज मुंबईत दिली. देशाच्या आर्थिक विकासात शहरांचं मोठे योगदान असल्यानं त्याचं प्रतिबिंब यात दिसून येईल असं ते म्हणाले. आर्थिक विकास दर, ग्राहक किंमत आधारित चलनवाढ निर्देशांक आणि औद्योगिक उत्पादन निर्देशांक मोजण्याच्या सुधारित पद्धती आणि नवीन पायाभूत वर्ष यासंदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित परिषदेत ते बोलत होते. अनेक राज्यांनी राज्याचा विकास दर मोजण्यासाठी नवीन पायाभूत वर्ष स्वीकारलं असून इतर राज्यंही लवकरच त्याचा अवलंब करतील. जिल्हा उत्पादन निर्देशांक अधिक परिणामकारक करण्यासाठी सुधारित दिशानिर्देश लवकरच अंमलात येतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

डिजिटल घोटाळ्यांमध्ये ग्राहकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं नवे दिशानिर्देश जारी केले आहेत. यात बँकांची जबाबदारी आणखी ठळकरित्या स्पष्ट केली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

होल्ड व्हाइस कास्ट

सर्व बँकांसाठी रिजर्व बँकेनं जारी केलेल्या निर्देशानुसार ग्राहकाच्या खात्यासाठी सुरक्षा पडताळणीची बहुस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात अपयश, चुकीच्या माहितीच्या लॉगिन करण्यात अपयश आलं तर ग्राहकाला कळवण्यात दिरंगाई, ग्राहकानं खात्यावर लादलेल्या आर्थिक मर्यादांपेक्षा अधिक रकमेचे व्यवहार झाले तर ग्राहकांना झालेल्या नुकसानीसाठी बँक जबाबदार असेल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. यासंदर्भातले दिशानिर्देश रिझर्व्ह बँकेनं आज जारी केले. १ जानेवारी पासून हे नियम लागू होणार आहे.

याशिवाय ग्राहकांना स्वतःच्या खात्यात काही दुर्व्यवहार झाले तर ताबडतोब पुढचे व्यवहार थांबवण्याची मुभा असेल. तसंच कार्ड, ऑनलाइन किंवा इतर व्यवहार चालू बंद करण्याची तसंच त्यावर आर्थिक मर्यादाला लावण्याची मुभा असेल. तसंच मोठ्या रकमेचे व्यवहार होत असतील तर ग्राहकाच्या विश्वासार्ह व्यक्तीकडून त्याची पडताळणी झाल्याशिवाय ते पूर्ण होणार नाही, याची पडताळणी करणारी यंत्रणा उपलब्ध करुन देणे बँकांना आवश्यक असेल. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना याचा फायदा होईल आणि फसवणुकीच्या आधारे त्यांच्या खात्यातून होणारे मोठ्या रकमेचे व्यवहार टाळता येतील. १ जुलैपासू हे दिशानिर्देश लागू होणार आहे.

<><><><><>

गेल्या काही दिवसांपासून देशातल्या शेअर बाजारात झालेल्या तेजीमुळं झालेला नफा आज गुंतवणूकदारांनी काढून घेतला. त्यामुळं शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज १ हजार ४८४ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार ४३६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४५१ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ३५० अंकांवर बंद झाला.

<><><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वेलिंग्टन इथं झालेला पहिला क्रिकेट कसोटी सामना आज अनिर्णित राहिला. सामन्याच्या पहिल्या डावात न्यूझीलंडनं ३६८ धावा केल्या होत्या. तर भारतानं पहिला डाव ९ बाद ७२० धावांवर घोषित करुन, ३५२ धावांची आघाडी घेतली होती. न्यूझीलंडनं दुसऱ्या डावात संयमी फलंदाजी करत ५ गड्यांच्या मोबदल्यात २३९ धावा केल्या आणि सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवलं. त्यामुळे, पुढच्या वर्षीच्या कसोटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात थेट स्थान मिळवण्याच्या भारताच्या आशा धूसर झाल्या आहेत. त्यासाठी पात्र ठरण्याच्या दृष्टानं भारत आता ५० टक्के गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. भारताला आता आणखी सहा कसोटी सामने खेळायला मिळणार आहेत.

//<><><><><><>//